सन २०१५

# ओळख कर्तृत्ववान महिलांची ...



प्रा. प्रवीण घोडेस्वार

# अनुक्रमणिका


मा. कुलगुरूंचे मनोगत ........ I

प्रस्तावना ........ II

कर्तृत्वशालिनींचा परिचय ........ VII

१. इराणच्या पहिल्या महिला उपराष्ट्रपती - मासुमेह इब्तेकर ........ १

२. पहिल्यांदाच सार्वजनिक व्यासपीठावर येणाऱ्या अफगाणिस्तानच्या प्रथम महिला - रुला गनी ........ २

३. पीटर मॅकलर पुरस्कारप्राप्त - झैना इराहिम ........ ३

४. करेज इन कार्टूनिंग अवॉर्ड मिळवणाऱ्या - अटेना फरघदानी ........ ५

५. रिझर्व्ह बँकेच्या सर्वांत तरुण मुख्य महाव्यवस्थापक - प्राची मिश्रा ........ ७

६. अमेरिकन सिनेटर एच. जॉन हेन्झ स्मृती पुरस्कारप्राप्त - डॉ. संगीता भाटिया ........ ८

७. ज्वाला वुमन ऑफ द इयर - डॉ. पल्लवी तिवारी ........ १०

८. डीआरडीओच्या पहिल्या महिला संचालक - जे. मंजुळा ........ १२

९. अफगाणिस्तानातली पहिली महिला चालक - सारा बाहाई ........ १४

१०. नॅनसेन शरणार्थी पुरस्कारप्राप्त - अकिला असिफी ........ १५

११. पॅनक्रियाटिक कॅन्सरवर जगातले पहिले संशोधन करणाऱ्या - डॉ. मिनोती आपटे ........ १७

१२. 'काउन्सिल ऑफ आर्किटेक्चर'चा राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारी - प्राची सावंत ........ १९

१३. इंग्लंडच्या पहिल्या महिला बिशप - रेव्हरंड लिबी जेन ........ २१

१४. कॉम्रेड गोविंद पानसरे पुरस्काराच्या पहिल्या मानकरी - मुक्ता मनोहर ........ २३

१५. यंग ग्लोबल लीडर्समध्ये गणना झालेल्या - डॉ. क्रिती कारंथ ........ २५

१६. माहिती तंत्रज्ञान कायद्यातले कलम ६६-ए रद्द करणारी - श्रेया सिंघल ........ २८

१७. आफ्रिकी वंशाच्या अमेरिकेच्या पहिल्या महाधिवक्त्या - लॉरेटा लिंच ........ ३०

१८. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा राष्ट्रीय साहित्य पुरस्कार मिळविणाऱ्या - तेमसुला आओ ........ ३१

१९. टाटा समूहाची पहिली महिला संचालक - फरिदा खंबाटा ........ ३३
२०. गुगलच्या सिक्युरिटी प्रिन्सेस - परिसा तबरीज ........ ३५
२१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा रुक्मिणी पुरस्कार मिळवणाऱ्या - प्रेरणा सहाणे - दीक्षित ........ ३७
२२. आंतरराष्ट्रीय महिला शांती सैनिक पुरस्कार विजेत्या - शक्तीदेवी ........ ३९
२३. मॅकडोनाल्ड उत्कृष्ट शिक्षिका पुरस्कार विजेत्या - डॉ. प्रीथिका कुमार ........ ४१
२४. मेसिंजर ग्रंथालय पुरस्कार विजेत्या - मेलिसा मीड ........ ४३
२५. टाइम मासिकाच्या 'पर्सन ऑफ द इयर' - अँजेला मर्केल ........ ४५
२६. ब्रिटनच्या रॉयल सोसायटीचा विन्टन पुरस्कार मिळवणाऱ्या - गाया व्हिन्स ... ४८
२७. आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट जगातला भारतीय दबदबा - पद्मश्री वॉरियर ........ ५०
२८. फॉर्च्युनच्या शक्तिशाली स्त्रियांच्या यादीत स्थान मिळवणाऱ्या - पायल कडकिया ........ ५२
२९. ब्रिटनच्या महसूल विभागातले दुसरे सर्वांत मोठे मंत्रिपद भूषवणाऱ्या - सीमा मल्होत्रा ........ ५४
३०. शुद्ध पेयजल चळवळीत कार्यरत असणाऱ्या - डॉ. जुलेखा दाऊद ........ ५६
३१. महिला जागृतीचे कार्य करणाऱ्या निर्यातदार - गिरिजा पावते ........ ५८
३२. अंधश्रद्धा विरोधात लढा देणाऱ्या - बिरुबाला राभा ........ ५९
३३. शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार विजेत्या - विदिता वैद्य ........ ६१
३४. सामाजिक उपक्रमांत सक्रिय असणाऱ्या - डॉ. आशालता देवळीकर ........ ६३
३५. धाडसी अधिकाऱ्याची धीरोदात्त पत्नी - सब लेफ्टनंट चिप्पी देवासिया ........ ६५
३६. चाळिशीत नौदलात दाखल होणाऱ्या - सब लेफ्टनंट संध्या वाधवा ........ ६६
३७. लष्करात अधिकारी होणाऱ्या पहिल्या वीरपत्नी - लेफ्टनंट प्रिया सेमवाल ........ ६७
३८. 'हॅपी टु ब्लीड' मोहीम सुरू करणारी - निकिता आझाद ........ ६८
३९. रुद्रवीणा वाद्याला सहज रूप देणाऱ्या - ज्योती हेगडे ........ ७०
४०. इयत्ता पाचवीच्या अभ्यासक्रमात स्थान मिळविणाऱ्या लेखिका-विमल मोरे ... ७२
दखल ........ ७५
श्रद्धांजली ........ ७९

## मा. कुलगुरूंचे मनोगत

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये या पुस्तकाची भर पडली याचा आनंद होत आहे. आज आपण एकविसाव्या शतकात वाटचाल करीत आहोत. या एकविसाव्या शतकात जगभरातल्या स्त्रिया जवळपास सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी करताना दिसत आहेत. आतापर्यंत स्त्रियांसाठी निषिद्ध मानल्या गेलेल्या क्षेत्रातही यशाचे नवनवीन मानदंड स्त्रिया प्रस्थापित करीत आहेत. सन २०१५ या वर्षात वेगवेगळ्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या, यश संपादन केलेल्या स्त्रियांच्या कर्तृत्त्वावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा केलेला प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक अशा सर्वच स्तरांवर चमकलेल्या स्त्रियांची छोटेखानी ओळख यात करून दिलेली आहे. यातल्या बहुतांशी स्त्रियांनी परिस्थितीशी दोन हात करून, लढा देऊन, हिंमत न हारता आपले ईप्सित साध्य केलेले आहे, तर काही स्त्रियांनी पारंपरिक वाटा टाळून वेगळ्या वाटेवर आपल्या पाऊलखुणा उमटवल्या आहेत. समाजातल्या कर्तृत्ववान स्त्रियांच्या कामाची दखल घेऊन त्यांचे काम लोकांसमोर आणणे या सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांची पूर्तता सदर पुस्तकाच्या रूपाने होत आहे.

या परिचयामधून जगभरात, देशात, राज्यात आणि आपल्या भोवतालच्या परिसरात स्त्रिया काय नि कोणत्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत याचे आकलन होण्यास मदत होते. या स्त्रियांना मिळालेले हे यश सहजसाध्य नाहीये. त्यासाठी अनेकींना संघर्ष करावा लागला आहे. त्यांचा हा संघर्ष इतरांना प्रेरणा देणारा नि दिशादिग्दर्शन करणारा ठरेल, असे मला वाटते. त्याचप्रमाणे या वर्षात जग सोडून गेलेल्या कर्तृत्ववान स्त्रियांचेही स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. यातून त्यांच्या कार्यकर्तृत्वावर पुन्हा एकदा प्रकाशझोत टाकल्याने अशा स्त्रियांच्या कार्याला उजाळा मिळाला आहे. पुस्तकाच्या अखेरीस वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्त्रियांची जाता-जाता नोंद 'दखल'मध्ये घेऊन गत वर्षातल्या स्त्री कर्तृत्त्वाचे समग्र दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकाचे लेखक प्रवीण घोडेस्वार यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करून अध्यासनाच्या पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा देतो.

**प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे**